# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - 2262 0601, 2269 0602, 22641150/51, फॅक्स - 22690007.

E-mail : 12desk@gmail.com Internet :htpp/www.dtemaharashtra.gov.in

**कालमर्यादा/तात्काळ**

क्रमांक :- १२(३)आस्था/२०१५/आप्रयो/१७५२

दिनांक :- 15 OCT 2015

प्रति,

**सहसंचालक ,**

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे/मुंबई/नागपूर/अमरावती/औरंगाबाद/नाशिक

**विषय : अशासकिय अनुदानित संस्थेतील कर्मचा-यांना सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजना लागु करणेबाबत..**

संदर्भ : 1. संचालनालयाचे पत्र क्रमांक 12(3)/आस्था/2011/आप्रयो/19150,दि.19.10.2011

2. शासन पत्र क्रमांक संकीर्ण-2012/(63/12)/ताशि-2, दि.23.09.2015.

उपरोक्त विषयास अनुसरुन संचालनालयाच्या संदर्भीय १ च्या पत्रानुसार या संचालनालयाच्या अखत्यारीत असलेल्या अशासकिय अनुदानित पदवी/पदविका संस्थेतील वर्ग ३ व ४ संवर्गातील कर्मचा-यांना ६ व्या वेतन आयोगानुसार सुधारीत सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजना लागु करणेबाबत शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यांत आलेला होता. सदर प्रस्ताव शासन स्तरावरुन वित्त विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडे मान्यतेसाठी सादर केला असता, शासन स्तरावरुन आवश्यक माहिती उपलब्ध करुन देणेबाबत संदर्भीय २ च्या पत्रानुसार सुचित केलेले आहे. ( सोबत शासन पत्र )

तरी सदर पत्रान्वये आपणांस कळविण्यांत येते की, शासनाच्या पत्रातील मुद्दयापैकी क्र.२,४,व ६ नमुद मुद्दयासंदर्भात आपल्या विभागाची माहिती <u>दि.17.10.2015 पर्यंत</u> email द्वारे या संचालनालयांस उपलब्ध करुन देण्यांत यावी.

(दयानंद मेश्राम)

सहसंचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य मुंबई.

पृ.क्र.विकाअ/आस्था/आप्रयो/२०१५/2658

दिनांक - 23 OCT 2015

प्रत : प्राचार्य, डॉ. पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन, अमरावती आणि प्राचार्य, गीतादेवी खंडेलवाल इस्टीटयुट ऑफ फार्मसी, अकोला यांना कळविण्यात येते की, या सोबतच्या पत्रातील मुददा क्र. २,४,व ६ ची माहिती तात्काळ या कार्यालयास पाठविण्यात यावी .

(डी एन शिंगाडे)

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,

वि.का.अमरावती

१) उपरोक्त नमूद शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती योजना, सेवांतर्गत आश्व
प्रगती योजना लागू होती किंवा कसे ? लागू असल्यास त्याबाबतचा शासन निर्णय

२) कोणकोणत्या संस्थेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सदरहू योजना लागू करावयाची त्या संस्थांची नांवे (प्रत्येक संस्थेनिहाय मंजूर पदे, कार्यरत पदे, रिक्त पदे)

३) सदरहू योजना केव्हापासून लागू करावयाची आहे

४) ज्या कर्मचाऱ्यांना सदरहू योजना लागू करावयाची आहे त्या कर्मचाऱ्यांची पदन
वेतनश्रेणी, ग्रेड पे, कर्मचाऱ्यांची संख्या, पदोन्नतीचे पद, सेवांतर्गत आश्वासित प्र
योजनेंतर्गत मिळणारी वेतनश्रेणी

५) सदरहू कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू केला त्याबाबतचे आदेश

६) सदरहू योजना ज्या दिनांकापासून लागू करावयची आहे त्यानुसार येणारा खर्च व सद
खर्च कश्याप्रकारे भागविता येणार आहे त्याबाबतची माहिती.

७) सदरहू कर्मचाऱ्यांची सेवाभरती कशाप्रकारे केली जाते (सेवाप्रवेश नियम)

८) संबंधित कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू आहेत किंवा कसे

का. अ. (नाशि) २